SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्‌गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

# नवरात्र आठवी माळ

॥ श्री स्वामी समर्थ ॥

अष्टमीचे दिवशी अष्टभुजानारायणी हो

सहयाद्री पर्वती राहिली उभी जगज्जननी हो ।

मन माझे मोहिले शरण आलो तुजलागूनी हो ।

उदो स्तनपान देऊनी सुखी केले अंत: करणी हो। उदो

अर्थ :- अष्टमीचे दिवशी अष्टभूजा असलेली देवी नारायणी आहे. ती जगत् जननी सहयाद्री पर्वतावर भक्तांच्या कल्याणासाठी उभी आहे तिचे ते मनमोहिनी रूप पाहून ती तिच्या नतमस्तक झालो आहे मी पूर्णपणे तुला शरण आलो आहे.

उल्लेखानुसार आपल्या तेजाने संपूर्ण विश्वाला प्रकाशमान करणारी महागौरी देवी आहे देवीच्या या स्वरूपाला अन्नपूर्णा, ऐश्वर्य, प्रदायिनी, चैतन्यमयी असे ही संबोधले जातेः चतुर्भुज महागौरीच्या एका हातात त्रिशूल तर दुसऱ्या हातात डमरु, तिसरा हात अभ्य मुद्रा तर चौथा हात वरदान मुद्रेत आहे

मंत्र-॥ ॐ देवी महागौर्यै नमः ।।

शुभ निशुंभ राक्षसाचा वध करण्यासाठी महागौरीने कौशिकी, स्वरूप धारण केले आहे ही देवीची एक लीला होती अशी कथा पुराणात आहे.

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

तसेच काळरात्रीच्या रुपात पार्वती मातेने राक्षसांचा वध केल्यावर तिला काली माता म्हणून संबोधले गेले मातेने केलेल्या कठोर तपस्येने भगवान ब्रहमा प्रसन्न झाले त्यांनी पार्वती मातेला मान सरोवर नदीत स्नान करायला सांगितले त्या नदीत स्नान करताच त्यांचे सर्व शरीर पुन्हा श्वेत रंगानी उजळून निघाले. म्हणून त्यांना महागौरी या नावाने ओळखले जाऊ लागले अशा देवी महागौरीची पूजा केल्याने इच्छित फळ मिळते सर्व संकटाचा नाश होतो. अनेक जन्मांची पापे नष्ट होतात त्यांच्या चरणी शरण गेल्यावर मोक्षाचे दरवाजे उघडतात असे धर्मग्रंथात म्हटले आहे.या अष्टमीच्या दिवशी कुमारिका पूजन, कुमारिका भोजन कुमारिका वस्त्रदान, लेखणी दान केली जाते. हवन ही करतात याच दिवशी श्री जगदंबे मातेचा नवरात्रीतील सर्वात मोठा उत्सव साजरा केला जातो या रात्रीला महारात्री असे म्हटले आहे पुढील प्रमाणे:

संध्याकाळी ६ ते रात्री १२ एक पर्वकाळ रात्री १२ ते ३. सध्यरात्र पर्वकाळ ३.०० ते दुसऱ्या दिवशी सूर्योदयापर्यंत महापर्वकाळ या काळातच त्रिगुणात्मीक देवी देवताचे पूजन, अर्चन, पठण केले जाते यालाच महाअष्टमी महोत्सव असे संबोधले आहे. अजून एक माहीती देत आहे.

१९९१ पासून सलग पुढची २५ वर्ष स्थानामध्ये महाष्टमी रात्री शतचंडी (१०० पाठ) हे अनुष्ठान स्यानामध्ये केले जायचे हे अनुष्ठान करायला २५ लोक बसवून पूर्ण रात्रभर अनुष्ठान चालत असे या २५ वर्षीत कोणाकडूनही एक ही पैसा न घेता हा खर्च श्री गुरुमाऊली स्वतः करायचे पण हे अनुष्ठान येणाऱ्या प्रत्येक भाविकांसाठी (साधकांसाठी) असायचे उत्तर रात्री देवी याग, दान, मार्जन, तर्पण, पूजन बलिदान असा महोसव स्थानामध्ये साजरा होत होता व अष्टमी जागरण केले जात होते आजही महाअष्टमीला जप, पुजन हवन, देवी बाग, मंत्रयाग, शक्ति याग आणि बलिदान पूर्णाहुती आणि श्री जगदंबे मातेची महापूजा ही या स्थानान गुरुमाऊली निस्वार्थी, निरपेक्ष भावनेने भक्ताच्या कल्याणासाठी करतात. याचेच फळ म्हणजे त्या शक्ती इथे सदा आपले कार्य करत असतात व आलेल्या भक्तांना आशीर्वाद देत असतात कहणूनच या स्थानाची पवित्रता पाळणे हे प्रत्येक भक्तांचे आदय कर्तव्य आहे.

जगदंब

# बँक डीटेल्स

## G-PAY

Shree sadguru Foundation

UPI ID: shreesadgurukrupa.foundation@okaxis

Scan to pay with any UPI app

IDFC FIRST Bank

SCAN & PAY

UPI ID: shreesadguru1@idfcbank

| | |
|---|---|
| **Name** | SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION |
| **Account Number** | 10227556284 |
| **IFSC** | IDFB0040156 |
| **SWIFT Code** | IDFBINBBMUM |
| **Bank Name** | IDFC FIRST |
| **Branch** | POWAI BRANCH |

**अशा या महापर्वणी दिवशी आम्ही अनुष्ठान पूजा करून देतो. ज्यांना ही पूजा करावयाची असेल त्यांनी संपर्क साधावा.**

**संपर्क क्रमांक : 7304904149**

**🌐- shreesadguruvaidikfoundation.com**